# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 07/01/2022 (शनिवार) दुपार

---

## अवैध रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध कारवाई

**पो.स्टे. बेला**:— अंतर्गत ०६ कि. मी. अंतरावरील मौजा आष्टा येथील आष्टा नदी पलीकडे येथे ०५/०१/२०२३ चे १६.०० वा. पुर्वी यातील फिर्यादी नामे— भुपेन्द्र बालाजी कापटे, वय ४४ वर्षे, रा. मनिष नगर नागपुर, मंडळ अधिकारी, (सोनेगाव लोधी) हे सोनेगाव लोधी येथील मंडळ अधिकारी असुन दि. ०५.०१.२०२३ रोजी १६.०० वा. आपल्या पथकासह मिळालेल्या माहीतीनुसार मौजा आष्टा नदीच्या पलीकडे वनविभागाच्या झुडपी जंगल जमीनीवर अंदाजे ३० ब्रास रेतीची साठवणुक केल्याचे दिसुन आल्याने कोणीतरी अज्ञात इसमाने आष्टा नदीच्या पात्रातुन अवैद्यपणे वाळु काढुन वनविभागाच्या झुडपी जंगल जमीनीवर अंदाजे ३० ब्रास रेती किमती अंदाजे ६००००/— रुपयाची साठवणुक केल्याबाबत अज्ञात इसमा विरुद्ध लेखी रिपोर्ट दिल्यावरुन सदर गुन्हा नोंद केला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरून पो.स्टे. बेला येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असुन गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार ब. नं. ६८६ अजय चौधरी मो. क्र. हे ९८२३१८६६८६ करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. एमआयडीसी बोरी** :— अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील सोलसेन कंपनी MIDC बोरी येथे दिनांक ३०/१२/२०२२ चे १८.०० वा. ते दिनांक ०२/०१/२०२३ चे १३.०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— बिपुल वसंत गुप्ते, वय ४५ वर्ष, रा. २६३ HB स्टेट सोनेगाव नागपूर यांची टेंभरी बी झोन मध्ये ग्रिम लाईन सोलसेन नावाची इलेक्ट्रीक कंपनी आहे. फिर्यादीने मुद्देमाल ठेवण्याकरीता गोडावून तयार केले आहे. नमुद घटना वेळी व ठिकाणी गोडावून मधून १) बॅटरी १५०AH २) बॅटरी १५०AH ३) HD क्रिस्टल १० TZ कॅमेरा ४) PC कॉम्प्युटर (DELL) ५) LED लाईट २ ६) MCB बॉक्स ७) केबल बंडल २.५ mm ८) पेन ड्राईव्ह ८ GM ३ ६४GB ३ ९) केबल बंडल १.५ mm १ १०) मायक्रोव्हेव ओव्हन ११) मिक्सर ग्राइंडर १२) कुलर १३) गॅस बर्नर १४) जर्मन गंज २ मोठे १५) सेंटर टेबल १६) पाईप रेग्युलेटर १७) डिनर सेट १८) ग्लास सेट असा एकुण किंमती अंदाजे ८५०००/— रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. एमआयडीसी बोरी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ४६१, ३८०, ४२७ भादवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास ASI /१२६२ राजेन्द्र डहाके मो. क्र. ९८२३५१७४१२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**